ISSN:
RESONET : INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY OPEN ACCESS PEER REVIEWED JOURNAL
Volume : 1 Issue: 01 | March 2026

# संत गाडगेबाबा यांची समतावादी आणि पुरोगामी विचारसरणी

डॉ. एन.व्ही. शिंदे
सहयोगी प्राध्यापक, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा
पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्न
ई संवादः ९८५०१२५५८४
ई मेल: shindenamdeo77@gmail.com

**गोषवाराः**

सर्वसामान्य, बहुजन समाज निरक्षरता, अंधश्रद्धा, व्यसनाधिनता यातून कायमचा मुक्त व्हावा यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या समाजपुरूषांच्या यादीमध्ये अग्रस्थानी असणारे संत गाडगेबाबा आहेत. खेड्यामधील भोळ्याभाबड्या समाजाच्या उन्नतीसाठी त्यांच्या भाषेत, सहज सोपे करून सांगणाऱ्या लोकोत्तर आणि लोकसंस्कारपीठ असलेल्या गाडगेबाबांच्या समतावादी आणि पुरोगामी विचारसरणीचा प्रत्यय समाजाला व्हावा. या त्यांच्या विचारसरणीची प्रेरणा घेऊन समाजाचे दिशादर्शन व्हावे. याकरिता सदरच्या संशोधन लेखामधून त्यांच्या विचारसरणीची उदारणांसह आणि जीवनानुभवांसह मांडणी केली आहे.

**सूचनक शब्दः** संत गाडगेबाबा, गाडगेबाबांचे विचार, पुरोगामी आणि समतावादी संत गाडगेबाबा, संत गाडगेबाबांचे वैचारिक कार्य इ.

**प्रास्ताविकः**

'देव दगडात नसून तो माणसात आहे.' असे सोप्या शब्दांमध्ये जीवनाचे महत्त्व, माणुसपणाचे आणि समतावादी तत्त्व गाडगेबाबांनी समाजाला समजावून दिले. संत गाडगेबाबा यांचे मूळ नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म अमरावती जिल्हयातील दर्यापूर तालुक्यातील शेणगाव याठिकाणी २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला. लहानपणापासून त्यांच्या वाट्याला संघर्ष आणि कष्ट सोबतीला होते. गुरे राखणे, गोठे झाडणे, शेती करणे अशी कामे ते करीत. १९८२ साली कुंताबाईशी विवाह करून संसाराला सुरूवात केली. पुढे संसारत्याग करून समारे १२ वर्षे देशाटन केले. प्रत्यक्ष लोकजीवन अनुभवले. यातूनच त्यांच्या समतावादी आणि पुरोगामी विचारसरणीची जडणघडण होत गेली. यातूनच त्यांनी दीन, दुबळे, अनाथ, अपंग यांची सेवा सुरू केली. तसेच स्वजीवनातून इतरांना समतावादी, विज्ञानदृष्टी आणि पुरोगामी विचारसरणीचे दर्शन घडविले.

**उद्दिष्टेः**

संत गाडगेबाबांचे समाजकार्य समजावून घेणे. गाडगेबाबा यांची पुरोगामी आणि समतावादी विचारदृष्टी समजून घेणे. प्रत्यक्ष कृतीद्वारे जीवनाचे तत्त्व प्रकर्षाने लक्षात आणलेले समाजापर्यंत पुन्हा पोहचविणे. तसेच मानवी जीवनामधील समतावादी आणि पुरोगामी विचारसरणीचे महत्त्व लक्षात आणून देणे.

**संशोधन पद्धतीः**

प्राथमिक माहिती स्त्रोत आणि दुय्यम माहिती स्रोत या पद्धतीमधील विविध घटकांचा आवश्यक तिथे वापर केला जाईल. संशोधन लेखासाठी दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर केला आहे. त्यामध्ये ग्रंथालयामधील पुस्तके, इंटरनेट, विविध वर्तमानपत्रे आणि वेबसाईट यांचा वापर प्रामुख्याने माहिती संकलन आणि विश्लेषण यासाठी केला आहे.

**महत्त्व आणि उपयुक्तताः**

समाज व मानव उन्नतीसाठी संत गाडगेबाबा यांच्या विचारदृष्टीची गरज प्रामुख्याने अधोरेखित करून समाजाला दिशादर्शन करणे. सर्वसामान्य लोकांमधील अंधश्रद्धा, अज्ञान, विषमतावादी वृत्ती, निरक्षरता नष्ट करण्याच्या दृष्टीने गाडगेबाबांच्या विचारांचे पथदर्शन घडविणे आवश्यक आहे. अतिशय साधी राहणी, निरपेक्ष व असंग्रही वृत्तीने मनुष्य आनंदी व समाधानी जीवन जगू शकतो; याचा प्रत्यय गाडगेबाबांच्या जीवनामधून लक्षात आणून देणे समाज विकासाच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

**विश्लेषणः**

संत गाडगेबाबा यांनी सुमारे १२ वर्षे देशाटन केले. त्यामधून त्यांनी प्रत्यक्ष मानवी जीवन अनुभवले. समाजाला नेमक्या कोणत्या गोष्टींची किंवा प्रबोधानाची गरज आहे, हे जाणून त्यांनी आपल्या कार्याला सुरूवात केली. समतावादी दृष्टीकोणः बहुजन समाज जागृतीसाठी त्यांनी कीर्तन परंपरेचा प्रभावी वापर केला. मनुष्याला मनुष्यामधील मानवपणाची जाणीव करून देण्यासाठी त्यांनी कीर्तनाद्वारे प्रबोधन केले. सर्वसामान्य कष्टकरी वर्ग सुखाने जीवन जगण्यासाठी त्यांच्यामधील व्यसनाधिनता, अज्ञान आणि अंधश्रद्धा सर्वप्रथम दूर करण्याचा प्रयत्न करून समतावादी वृत्ती विकसित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. बेघरांना आसरा देणे, अंध-अपंग यांची मदत करणे त्यांना औषध उपचार करणे, मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे, गरिब तरूण-तरूणींचे विवाह ठरविणे, कर्ज काढू नये, चैन करू नये, कष्टाशिवाय भाकर खाऊ नये, निरंतर उद्योग करावा, मुक्या प्राण्यांना अभय द्यावे, इतरांना जगण्यासाठी हिंमत द्यावी तसेच जगणे आणि वागणे यामध्ये तफावत नसावी अशा विचारांमधून आणि कृतींमधून गाडगेबाबांनी समजाला योग्य व समतावादी दृष्टी दिली.

वरीलप्रमाणे समतावादी तत्त्वज्ञान सतत ५० वर्षे लोकांना समजावून जनसामान्यांचे प्रबोधन केले. म्हणूनच ते लोकोत्तर ठरले. साधी राहणी, मोजक्या अपेक्षा आणि निरपेक्ष भावनेने त्यांनी कार्य केले. त्यांच्या असंग्रही वृत्तीमुळे त्यांना कोणत्याच गोष्टीचा लोभनव्हता. लोकांच्या भल्यासाठी धर्मशाळा उघडून अन्नछत्रे चालू केली. एकमेकांच्या मदतीमधून माणुसकीचे, समानतेचे दर्शन घडविले.

**कीर्तनातून समाज प्रबोधनः** लोकांना सोप्या शब्दांत सांगितलेले लक्षात येते; म्हणून त्यांनी कीर्तनाचा प्रभावी वापर केला. समता आणि मानवता धर्म यांची शिकवण दिली. ते म्हणतात, "शेंदूर माखूनिया धोंडा। पाया पडती पोरे रांडा।" या पद्धतीने त्यांनी खऱ्या मानव धर्माची शिकवण दिली. आभाळाचा मंडप करून कीर्तनाची सुरूवात व्हायची. कधी भजन, कधी श्रोत्यांशी संवाद, प्रश्न व उत्तरे अशा स्वरूपामध्ये ते लोकांमध्ये जनजागृतीचे कार्य करीत राहिले.

मानवता व समतावादी धर्मः गाडगेबाबांनी देव आणि धर्माची चिकित्सा मानवतेच्या अंगांनी करून ती कीर्तनाद्वारे लोकांना सोप्या शब्दांमध्ये पटवून दिली. देव व धर्म यांच्यामधील दलाली किंवा मध्यस्थी त्यांना मान्य नव्हती. धर्म सांगायचा नसून तो जगायचा असतो. धर्म ग्रंथात नसून तो जीवनात असतो. असे तत्त्वज्ञान त्यांनी लोकांना सांगून समाजपरिवर्तन घडवून आणले. यामुळेच आचार्य अत्रे त्यांच्याविषयी म्हणतात, "सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात." यातून गाडगेबाबांच्या कार्याची ओळख आणि महत्त्व लक्षात येते.

**पुरोगामी विचारसरणीः** संत गाडगेबाबांनी स्वतःच्या वागण्यातून, बोलण्यातून आणि कृतीतून लोकांना पुरोगामी विचारसरणीचे महत्त्व पटवून दिले. यासाठी कीर्तनाचा त्यांनी वापर केला. मानवता धर्माची शिकवण दिली. अंधश्रद्धा मुक्त समाजासाठी प्रबोधन केले. ते सांगतात, "देव पहावयास गेलो. तेथे देवचि होऊन गेलो." या उक्तीप्रमाणे देव माणसात असून माणुसकीचे महत्त्व निदर्शनास आणून दिले. हेच विचार आचरणामध्ये आणण्याचा आग्रह धरला. तुमचा देव परावलंबी असून त्याला अंघोळ, नैवेद्य, कपडे इतरांनी द्यावी लागतात. मठ मंदिरामधील संपत्ती महत्त्वाची नाही. ते स्वतः कधी मंदिरात जात नव्हते. यातून त्यांनी पुरोगामी विचारसरणी समाजमनामध्ये पेरली.

**शिक्षणाचे महत्त्वः** शिक्षणाशिवाय माणूस धोंडा आहे. अशिक्षितपणामुळे मानवी जीवनातील अंधश्रद्धा बळावते. यातूनच विनाश व अवनतीला सुरूवात होते. हे लोकांच्या लक्षात आणून दिले. शिक्षणप्रसाराचे कार्य करणाऱ्या कर्मवीर अण्णांशी त्यांचे आपुलकीचे नाते होते. "भाऊसाहेब आपल्या शिक्षणकार्याने अजरामर होतील." असे गाडगेबाबा म्हणतात. रयत शिक्षण संस्थेचे अनुदान बंद केलेले ते गाडगेबाबांनी सुरू करण्यास मोलाची मदत केली. यातूनच त्यांनी शिक्षणप्रसाराला चालना दिली. शिक्षणाचे समाज परिवर्तनामधील महत्त्व कृतीमधून लक्षात आणून दिले.

याशिवाय संत गाडगेबाबांनी अनेक समाजोपयोगी कामे मार्गी लावली. मद्याच्या आहारी गेलेल्या तरूणांना संसारी मार्गी लावले. दुष्काळग्रस्तांना अन्नदान, अनाथ वृद्धांसाठी झोपड्या, मुक्या प्राण्यांसाठी गोरक्षणे उभी केली, दारूबंदी, जात व अंधश्रद्धा निर्मूलन, पशुहत्या बंदी ही कामे त्यांनी अग्रकमाने केली. संत गाडगेबाबांसारखा कर्मयोगी दिवसरात्र समाजहितासाठी कार्य करीत राहिले. समाजामध्ये विज्ञानदृष्टी, पुरागामित्व आणि समतावादी विचारसरणी यांची पेरणी केली. याच दिशेने समाजाला विकासपथ दिसत आहे. हेच त्यांच्या कार्याचे आणि विचारांचे फलित आहे.

**निष्कर्ष आणि शिफारशीः**

संत गाडगेबाबांनी पेरलेले पुरोगामित्व आणि समतावादी वृत्तीचे विचारधन समाजाने आचरणात आणावे. यातच सर्व मानवजातीचे कल्याण दडले आहे. त्यांचे समाजकार्य मानवी विकासाच्या दृष्टीने खूप मौलिक असून त्यामधून समाजपरिवर्तनाला दिशा प्राप्त झाली. समाधानी, सुखी व आनंदी जगण्याचा मार्ग गाडगेबाबांच्या विचारांमध्ये आहे. माणूसाने माणसासारखे जगणे यात विश्वकल्याण स्पष्ट होते.

**समारोपः**

गाडगेबाबांचे कार्य हे 'लोकसंस्कारपीठ' यासारखे आहे. लेखक गो.नि. दांडेकर त्यांच्या समवेत काही वर्षे भ्रमती करत होते. त्यांना जे अनुभव आले त्यातून त्यांनी गाडगोबाबांविषयी म्हटले, "गाडगेबाबांचे संपूर्ण जीवन म्हणजे धगधगत्या अग्निकुंडाची कहाणी आहे." त्यांनी लोकजागृती आणि लोकसेवा केल्यानेच समाजाला योग्य दिशा प्राप्त झाली. गाडगेबाबांनी दशसूत्रीचा संदेश सर्वांना आचरणात आणावयास लावून समता आणि पुरोगामित्व लोकांच्या अंगी बाणविले. यामधून त्यांच्या विचारांची प्रगल्बता लक्षात येते. अशा या लोकसेवकाचा मृत्यू २० डिसेंबर १९५६ साली झाला.

**संदर्भग्रंथः**

१. पोतदार वसंत, गाडगेबाबा, अक्षर प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती १९९८

२. भोसले, द.ता. (डॉ.), लोकोत्तर गाडगेबाबाः जीवन आणि कार्य, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती जानेवारी २००७

३. भोसले, प्राचार्य शिवाजीराव, दीपस्तंभ, ओम अक्षरब्रम्ह प्रकाशन.

......